

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**********************************************************

**सूचना** **दि.** 09 / 01 / 2021

विवेकानंद कॉलेजच्या इतिहास विभागातील बी. ए. भाग - II च्या सर्व विद्यार्थी विद्यार्थिनींना सुचित करण्यात येते की, गुरुवार दिनांक 14 /01/2021 रोजी IDS HSRM पेपर क्रमांक –I "महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास " या विषयाच्या प्रकरण-3 (छ. शाहू महाराज - जीवन व कार्य) वरील सरप्राईज टेस्ट चे आयोजन चौथ्या तासाला रूम नंबर 17 मध्ये सकाळी 10 ते 10.45 या वेळेत केले आहे. तरी सर्व विद्यार्थ्यांनी तयारीनिशी टेस्टला वेळेवर उपस्थित राहावे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

**डॉ. एस. आर. कट्टीमनी**

इतिहास विभाग



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

[स्वायत्त] कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

*****************************************************

**प्रश्नपत्रिका** दि. 14 / 01 / 2021

बी. ए. भाग - II

सेमिस्टर - III पेपर क्रमांक - I

विषय - "महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास"

प्रकरण-3 छ. शाहू महाराज - जीवन व कार्य

सरप्राईज टेस्ट वेळ - सकाळी 10 ते 10.45

प्रश्न - राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचे मूल्यमापन करा . (गुण-10)



"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार"

-शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे,

(स्वायत्त) कोल्हापूर

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## इतिहास विभाग

**गुणपत्रक / मार्कलिस्ट** दि. 14/11/2021

वर्ग - बी.ए.- II सेमिस्टर - III

पेपर क्र - I टेस्ट - सरप्राईज टेस्ट

प्रकरणाचे नाव - महाराष्ट्रातील समाजसुधारकांचा इतिहास एकूण गुण - 10

| अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स | अ.क्र. | रोल नंबर | मिळालेले मार्क्स |
|---|---|---|---|---|---|
| 1 | S175 | 10 | 10 | | |
| 2 | S178 | 10 | 11 | | |
| 3 | S259 | 10 | 12 | | |
| 4 | S168 | 10 | 13 | | |
| 5 | S179 | 10 | 14 | | |
| 6 | S189 | 10 | 15 | | |
| 7 | S007 | 10 | 16 | | |
| 8 | S043 | 10 | 17 | | |
| 9 | S134 | 10 | 18 | | |

विषय शिक्षक स्वाक्षरी

126

10/10

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor [signature]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

4/11/2020

Class B.A - II Div. — Roll No. 5175

Suppliment No. — Subject H.S.R.M.

Test / Tutorial No. —

नाव : सानिया नझरुद्दीन मुल्लाणी
हजेरी क्र : 5175
वर्ग : B.A - II
विषय : H.S.R.M.

प्रश्न : राजर्षी छत्रपती शाहु महाराजांच्या सामाजिक कार्याचे परिक्षण करा.

उत्तर :

प्रस्तावना →

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक कार्यद्वारे बहुजन समाजाला जागृत करण्याचे व त्यांची सर्वांगिण प्रगती आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधिश म्हणजे कोल्हापूर येथील राजर्षी शाहु महाराज होय. महात्मा फुलेंनी सुरू केलेले समाज सुधारणांचे कार्य पुढे नेण्याचे कार्य शाहु महाराजांनी केले. कानपूर येथील अखिल भारतीय कुर्मी क्षत्रिय जातीय परिषदेत 1919 मध्ये शाहु महाराजांना राजर्षी पदवी दिली गेली. समाजामध्ये विविध जाती आणि उपजाती असल्यामुळे सामाजिक विषमता निर्माण झालेली आहे. समाजाचा विकास करुन सामाजिक परिवर्तन करावे ही शाहु महाराजांची तळमळ होती. त्यामुळे त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग समाज सुधारण्यासाठीच मोठ्या प्रमाणात केला. जातीयता अर्थात जातीभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी विविध मार्गाचा अवलंब केला. जातीयतेची

कृत्रिम बंधने मोडून टाकण्यासाठी विविध ठिकाणी व्याख्याने दिली. तसेच ठिकठिकाणी सामाजिक विषमते विरुद्ध परिषदा घेतल्या. शाहु महाराजांनी राज्यातील सार्वजनिक पाणवठे व मंदिरे खुली नव्हती. शाहू महाराजांनी हे बोलके नव्हते तर ते कृतिशील समाज सुधारक होते.

① अस्पृश्योद्धार :

शाहु महाराज सत्तेवर आल्यावर कोल्हापूर संस्थानात दलितांची संख्या समाजात मोठ्या प्रमाणात होती. त्यांना शिक्षणाची गरज होती. दलित समाजाचे वसतिस्थान गावाच्या बाहेर होती. समाजात त्यांना अत्यंत अपमानास्पद वागणुक दिली जात असे. त्यामुळे शाहु महाराजांनी अस्पृश्यांसाठी चे कार्य हाती घेतले. यासाठी कायदेशीर निर्णय घेतले. त्यांनी अस्पृश्यतेसाठी पुढील पावले उचलली. –

1. अस्पृश्यांसाठी असलेल्या शाळेच्या संख्येत त्यांनी वाढ केली. ५ शाळेच्या संख्येवरून 1917 मध्ये त्यांची संख्या 27 झाली.
2. अस्पृश्य विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत दिली.
3. अस्पृश्य व्यक्तिना शासकीय कार्यालयात भरती दिली.
4. स्पृश्य रोग्याप्रमाणेच अस्पृश्य रोग्यांना तपासण्याच्या त्यांची सेवाशुश्रुषा करण्यासंबंधीच्या सक्त आज्ञा जारी करण्यात आल्या.
5. सार्वजनिक विहिरी, नदीचे पाणवठे, विश्रांतीगृहे अस्पृश्यांनी खुली केली. अस्पृश्यता पाळणाऱ्या व्यक्तीस कडक शासन करण्याचा इशारा दिला.
6. अस्पृश्य व्यक्तीस इतर नोकरांनी समतेची वागणुक दिली पाहिजे असे त्यांनी सांगितले. अन्यथा सरकारी अनुदान बंद करण्यात येईल.
7. राजर्षी शाहुंनी अस्पृश्यता निवारण परिषदांतून भाषणे केली. अनेक अस्पृश्य बांधवांना महाराज आपल्या बरोबर घेवून दौरे काढीत असत. अस्पृश्यांच्या सभा संमेलनात महाराज उपस्थित असत. त्यांच्यात मिसळत असत व त्यांच्याहातचे अन्न खात असत. वतनेदारीची व वेठबिगारीची पद्धत बंद केली.



COLLEGE ESTD JUNE 1964 Autonomous

② अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह :

राजर्षी शाहु महाराजांनी 14 एप्रिल 1908 मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु केली. अस्पृश्य वर्गासाठी अस्पृश्यातुनच सुशिक्षीत आणि सुधारणावादी पुढारी निर्माण व्हावेत. तसेच त्यांची आर्थिक उन्नती व्हावी या उद्देशाने या वसतिगृहाची स्थापना केली. शाहु महाराजांनी रविवार पेठेतील 25 खोल्यांची इमारत या वसतिगृहास देऊन वार्षिक 55 रुपये अनुदान मंजूर केले. यातही अस्पृश्य व मुसलमान विद्यार्थ्यांची सोय केली होती. तसेच या अस्पृश्य मुलांच्या वर्गात काही समस्या उद्‌भवल्यास त्या संस्थेच्या कार्यकर्त्यांना ताबडतोब कळवाव्यात असेही सांगण्यात आले.

③ कुलकर्णी वतन नष्ट :

खेड्याचे प्रमुख पाटील व कुलकर्णी होते. पाटील व कुलकर्णी ही वतने शतकापासून रु.6 होती. पाटील जरी निरक्षर, अशिक्षित असल्यास गावाचा कारभार कुलकर्ण्यांच्याच हाती होता. पाटील हा मराठा असे तर कुलकर्णी ब्राम्हण. ब्राम्हणेत्तर पत्रकार व लेखक मुकुंदराव पाटील ~~हम~~ ~~क~~ यांनी कुलकर्णी लीलामृत हा ग्रंथ लिहून कुलकर्ण्यांच्या कारवाया कपटनीती व त्यांच्याकडून होणारा अन्याय यावर प्रकाश टाकला. म. फुले यांनी कुलकर्णीला ग्रामराक्षस म्हटले आहे. गावचा प्रमुख अशिक्षीत असल्याने कुलकर्णी आपल्या अधिकारांचा दुरुपयोग करुन गरिबांच्या मालकी हक्कात फेरबदल करत असे. कुलकर्णी हे सावकारी करत, खोट्या नोंदी ठेवत, गावात गुप्त कारस्थाने करीत म्हणून कुलकर्णी ही वतने रद्द करुन पगारी, तलाठी नेले. ब्राम्हण कुलकर्ण्यांकडुन जाणुनबुजून ही वतने काढुन घेतली असा समज पसरवला गेला. या निर्णया विरोधात डॉ. कुर्तकोटी, टिळक, प्रो. विजापुरकर यांनी शाहु महाराजांवर प्रचंड टिका केली, परंतु शाहु महाराजांनी आपला निर्णय बदलला नाही.

JUNE 1964 (Autonomous)



(P.T.O)

④ मागासवर्गीयासाठी आरक्षण :

शाहु महाराजांनी कोल्हापुर संस्थानाचा कारभार 1894 साली हाती घेतला. यावेळी कोल्हापूरच्या प्रशासनात 71 अधिकाऱ्यांपैकी 60 ब्राम्हण अधिकारी, 11 ब्राम्हणेत्तर अधिकारी होते. महाराजांच्या खाजगी नोकरवर्गात 52 पैकी 42 ब्राम्हण नि तत्सम वरिष्ठ वर्गाचे होते. मागासवर्गातील एकही व्यक्ती नोकरीस नव्हती. तसेच मोजक्या जागा चित्पावन ब्राम्हणांनी बळकावल्या होत्या. त्यामुळे राज्यकारभारात समतोल निर्माण करण्यासाठी आपल्या जन्मदिनी 26 जुलै 1902 रोजी शाहु महाराजांनी एक आदेश जाहिर केला. या आदेशामध्ये मागासवर्गीयांच्या उन्नतीसाठी शासकीय व निमशासकीय विभागामध्ये शेकडा 50% जागा राखुन ठेवण्याचे नमुद केले. महाराजांच्या या निर्णयामुळे बहुजन समाजात आनंद निर्माण झाला.

⑤ जातिभेद निर्मुलनाचा प्रयत्न :

समाजात विविध जाती, उपजाती आणि जमाती होत्या. प्रत्येक जाती धर्माचे विविध रितीरिवाज ही होते. त्यांच्यात सामाजिक ऐक्य राहणे अशक्य होते. समाजात जातिभेदाची कल्पना रूढ होती. प्रत्येक जातीने शिक्षण आणि जागृतीद्वारे आपले सामर्थ्य आणि संघटन वाढविले पाहिजे असे महाराजांनी बहुजन समाजाला सातत्याने सांगितले. आपली सुधारणा करावी व आपला दर्जा उंचवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे केल्यास जातिभेद नष्ट होण्यास फार काळ लागणार नाही असे मत महाराजांचे होते. त्यांनी जाती परिषदांना प्रोत्साहन दिले. त्यांनी आवश्यक त्या ठिकाणी कायदे करून जाती निर्मुलन करण्याची अंमलबजावणी केली.

⑥ विविध कलांना आश्रय :

शाहु महाराजांना विविध कलांचे छंद होते. शिकार, मल्लविद्या, संगीत, नाट्य, चित्रपट व चित्रकला इ. कलांना


(Autonomous)

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class ______ Div ______ Roll No. 5175

Suppliment No. ______ Subject H.S.R.M.

Test / Tutorial No. ______

त्यांनी आश्रय दिला. गावोगावी तालमी, आखाडे बांधण्यात त्यांनी प्रोत्साहन दिले. विविध कलाकारांना आश्रय दिल्याने विविध क्षेत्रात प्रगती घडुन आली. त्यांनी पत्रकार, लेखक, कवी, शाहिर, जलसाकार आदींना आश्रय दिला. त्यांच्यामुळेच कोल्हापूर हे मल्लविद्येचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले.

(7) आंतरजातिय विवाहाचा कायदा :

महाराजांच्या काळात आंतरजातिय विवाह संमत नसल्याने ते बेकायदेशिर ठरविले जात होते. विवाह ही धार्मिक बाब मानण्यात येई. आंतरजातिय व आंतरधर्मिय विवाहास व नोंदणी पद्धतीस मान्यता देणारा कायदा राजर्षी शाहु महाराजांनी 12 जुलै 1913 रोजी पास करुन कोल्हापूर संस्थानास लागू केला. तर या कायद्याची अंमलबजावणीही केली. मराठा व धनगर समाजात 100 मिश्रविवाह घडवून आणले. त्यांनी आपली चुलत बहीण चंद्रप्रभा हिचा आंतरजातिय विवाह केला. इंदुरचे धनगर समाजाचे यशवंत होळकर यांचेशी त्यांचे लग्न लावून दिले.

अशा प्रकारे राजर्षी शाहु महाराजांनी समाजाच्या हितासाठी कार्ये केली आहेत.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

131

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

10/10

Signature of Supervisor: [signature]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class: B.A II    Div. ____    Roll No. 5178

Suppliment No. ____    Subject: H.S.R.M

Test / Tutorial No. सृती राजेंद्र नाळे

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्याचे परीक्षण करा?

→ आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांची सर्वांगिण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजे राजर्षी छत्रपती शाहू महाराज होते. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तिमहत्त्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, आखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले.

सामाजिक कार्य :-

(1) शैक्षणिक कार्य :-- छत्रपती शाहू महाराज्यांच्या एकूण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. महात्मा फुले यांच्या प्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. शाहू महाराजांनी आधिकार गृहण केले तेव्हा बहुजन समाजात मॅट्रीक उत्तीर्ण झाले त्यांची संख्या अल्प होती. खेड्यात प्राथमिक शाळा नव्हत्या. स्त्री शिक्षण समाजात वाढले पाहिजे त्याशिवाय स्त्रियांच्या जिवनातील मागासलेपणा कमी होणार नाही यांची जाणिव महाराजांना होती.

(2) सामाजिक सुधारणेचे कार्य :-- छत्रपती शाहू महाराजांच्या अगोदर सामाजिक जिवनात जातिव्यवस्थेचे प्राबल्य होते. जातिभेदाच्या परंपरेमुळे भारतीय समाजात राजकीय किंवा सामाजिक जीवनात एकता नव्हती. जातिभेद ही आपल्या देशाच्या ऐक्याच्या

उन्नतीच्या मार्गातील पोंड आहे. ती दूर करण्यासाठी महाराजांनी प्रयत्नाची पराकास्‌ केली. जातिभेद संदर्भात महाराजांनी केवळ विचारच मांडले नाहीत तर आपल्या वैयक्तिक वागण्यातून या विषयी समाजासमोर आदर्श उभा केला. आवश्यक असे कायदे करून या विचाराच्या अंमलबजावणीचे कार्य केले.

3] वेदोक्त प्रकरण :-

शाहू महाराजांच्या जीवनातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात अमुलाग्र बदल करणारे प्रकरण म्हणजे वेदोक्त प्रकरणा कडे पाहिले जाते महाराज्यांनी सुरूवातीपासून जातिभेदाला विरोध करून समाजाभिमुख धोरणाचा स्विकार केला होता. सनातनी प्रवृत्तीचा स्वीकार करून समाजातील आपले स्थान टिकव-ण्याचा प्रयत्न करणाऱ्या ब्राम्हणांना हे मान्य नव्हते. सनातनी ब्राम्हणांनी करवीर राज्यात आपल्या अहंकारी वर्णवर्चस्वाच्या प्रवृत्तीमुळे असमाधानी हैदोस घातला होता. व जरी ब्राम्हण झाला भ्रष्ट। तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ।। ही त्यांची विचारास आचार धारा होती.

4] अस्पृश्योद्धार :-

अस्पृश्यता म्हणजे मानवजातीला लागलेला कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने तो हानिकारक आहे याची जाणीव महाराजांना होती. जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेतून अनेक जाती व जातिभेद निर्माण झाले. समाजाचे स्वरुप विस्कळीत बनले. भेदातून द्वेष निर्माण झाला व देशाची एकी नष्ट झाली. समाजाचे स्वरूप विस्कळीत बनले. जातिबंधने व दारिद्र्य यांनी गांजलेल्या समाजात महाराजांनी शिक्षणाची आवड निर्माण केली. अस्पृश्य मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळेल अशी व्यवस्था केली १९०८ साली कोल्हापूर येथे अस्पृश्य मुलांसाठी 'मिस क्लार्क वसतिगृह' सुरु केली

(13) 5] वेठबिगारी बंद :-

महाराजांनी वेठबिगारी बलुतेदारी कायद्याने बंद केली.

वेठबिगारी व बलुतेदारीमुळे महारांना कमीपणा स्वीकारावा लागतो. लाचारीने वागावे लागते याची जाणीव महाराजांना होती.

6] स्त्रियांची स्थीती सुधारणा :-

समाजातील स्त्रियांची स्थीती सुधारण्याच्या कार्याला महाराजांनी महत्व दिले. स्त्री-शिक्षणाला चालना दिली. स्त्रियांच्या बाबतीत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. स्त्रिया शीक्षीत झाल्या कुटूंब, समाज व पर्यायाने देशाचा विकास होईल. असा त्यांचा विश्वास होता. आंतरजातीय विवाह घडवून ~~घडवून~~ आणला.

7] ब्राम्हणेतर चळवळ :-

स्वराज्याच्या महाराजांच्या वास्तववादि रचनेमुळे त्यांनी सार्वजनिक शिक्षणप्रसार व जातीभेदाची बंधने शिथिल करण्यास निरनिराळ्या उपाययोजना केल्या. कायदे केले. बहुजन समाजात शिक्षणप्रसार करणे धार्मिक बंधनातून समाजाला राजकीय हक्क मिळवून देणे. हे त्यांनी आपले कार्य मानले समान संधीसाठी सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक हक्क व बहुजन समाजाला मिळवून देणे हे ~~ब्राह~~ ब्राम्हणेतर चळवळीचे प्रमुख सूत्र होते.

8] कला क्रिडा क्षेत्राचा विकास :-

छत्रपती शाहू महाराजांनी जुन्या राजवाड्यात आखाडा बांधून दिला. कुस्त्यासाठी खासबाग तयार केले. निरनिराळ्या पहिलवानांना बालोपासनेसाठी आवश्यक ते सर्व सहकार्य केले. समाजात व्यायामाची आवड निर्माण केली. कोणत्याही जातीचा विचार न करता कलागुणांना वाव दिला. गणपतराव जोशी, केशवराव भोसले, यांच्यासारख्या नाटकारांना व नटांना महाराजांचा आश्रय होता. तबलजी, पखवाजवादक यांच्या कलागुणांचे महाराज कौतुक करत. चित्रकार श्री दत्तोबा [illegible] श्री आनंदराव पेंटर पेंटर यांना महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे महाराष्ट्रात

ESTD JUNE 1964 (Autonomous)

चित्रकलेचा विकास झाला.

(9) मराठा समाजाचे धर्मपीठ :-
शाहू महाराजांच्या शासकीय, राजकीय आणि सामाजिक सुधारणांच्या मार्गात जगत्गुरू यांचा नेहमीच अडथळा व विरोध करीत होता. हा विरोध सत्ता धर्मसत्ता प्रतिष्ठी होऊन ते करीत राहिले. तेव्हा महाराजांनी मराठ्यांसाठी नवे धर्मपीठ उभे करून शंकराचार्यांची सार्वभौम धर्मशक्ती नष्ट करण्याचा निश्चय केला.

(10) करवीर नगरीचा विकास :-
कोल्हापूर हे त्यांचे गाव आहे. हे अनेक गाव १४ तळ्यांनी व्यापले आहेत. तसेच अनेक कुंडे, बावडी आहेत. कोल्हापूरात आरोग्यसुविधा, नगररचनेतील सौंदर्याची वाढ व सुधारणा, सार्वजनिक सुखसोई यांच्याकडे लक्ष दिले. कोल्हापूरचा सर्वांगिण विकास केला.

(11) जातीभेद निर्मुलनाच्या प्रयत्न :-
समाजात विविध जाती, उपजाती आणि जमाती होत्या. प्रत्येक जाती धर्माचे विविध रिती-रिवाज ही होते. त्यांच्यात सामाजिक ऐक्य राहणे अशक्य होते. समाजात जातिभेदाची कल्पना रूढ होती.

(12) आंतरजातीय विवाहाचा कायदा :-
महाराजांच्या काळात आंतर जातीय विवाह संमत नसल्याने तो बेकायदेशीर ठरविले जात होते. विवाह ही धार्मिक बाब मानण्यात येई. आंतरजातीय व आंतर धर्मीय विवाहास व नोंदणी पद्धतीस मान्यता देणारा कायदा राजर्षी शाहू महाराजांनी १२ जुलै १९१७ रोजी पास केला. अशा प्रकारे राजर्षी शाहू महाराजांनी समाजाच्या हितासाठी कार्य केले आहेत.

135

10/10

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

4/11/2020

Class बी.ए.-II, सेम-IV Div. Roll No. 5259

Suppliment No. Subject HSRM

Test / Tutorial No. Rajnandini Ramesh Salokhe

प्र १ राजर्षी छ. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचे परीक्षण करा.

→ कोल्हापूर संस्थानचे छत्रपती असलेले शाहूमहाराज हे एक थोर समाजसुधारक होते. महात्मा जोतिबा फुलेंच्या मृत्यूनंतर शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजास नेतृत्त्व व मार्गदर्शन पुरवले. त्यांचा जन्म २६ जून, १८७४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील 'कागल' या गावातील घाटगे कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. सामान्य लोकांना शिक्षण व रोजगार पुरवून छत्रपती शाहूंनी त्यांच्या उन्नतीचे कार्य केले. त्यांचे सामाजिक कार्य पुढीलप्रमाणे:-

i) ब्राह्मणेतर चळवळ: ब्राह्मणांनी छत्रपती शाहूमहाराजांना वेदोक्त विधी पार पाडण्याचा अधिकार नाकारला. यातूनच वेदोक्त प्रकरण उद्भवले. महाराजांनी आपल्या राजवाड्यात वैदिक विधी करण्याचा आदेश १९०१ मध्ये काढला. व मंदिरामध्ये ब्राह्मणेत्तर पुरोहित नेमले. मराठा जातीतील युवकांना वैदिक विधी पार पाडण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराजांनी खास पुरोहित शाळा स्थापन केली. या घटनेमुळे समाज हा ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशा दोन वर्गात विभागला गेला आणि ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध चळवळ सुरू केली.

ii) कुलकर्णी वतनाचे उच्चाटन: कुलकर्णी वतनदार हा ग्रामीण समुदायाच्या विकासाच्या मार्गातील मोठा अडथळा आहे, याची शाहूमहाराजांना खात्री झाली. म्हणूनच त्यांनी १९१८ मध्ये कुलकर्णी पदावर आनुवांशिकतेनुसार नियुक्ती करण्याची पद्धत नष्ट करणारा व त्याऐवजी तलाठी पद्धती सुरू करण्याचा आदेश काढला. त्यांनी तलाठी पदांवर कनिष्ठ जातीतील अनेक व्यक्ती नेमल्या.

Vivekanand College Kolhapur (Autonomous) Estd. June 1964

iii) अस्पृश्यता निवारण: कनिष्ठ जातींना त्रासदायक ठरणारी बलुता पद्धती छत्रपती शाहूमहाराजांनी १९१८ मध्ये नष्ट केली. १९१९ मध्ये त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यतापालनास बंदी घातली. आणि नळ, विहीरी, धर्मशाळा, दवाखाने व इतर सार्वजनिक ठिकाणेही अस्पृश्यांसाठी खुली केली. आंतरजातीय विवाहास पाठिंबा दिला आणि अशा विवाहांना वैधता मिळवून देण्यासाठी एक कायदा संमत केला. त्यांनी स्वतः अस्पृश्यांच्या हातचे चहापान स्विकारून अस्पृश्यता न पाळण्याचा आदर्श इतरांना घालून दिला.

iv) कनिष्ठ जातींना आरक्षण: त्याकाळी उच्च जातींना शिक्षण घेण्याचा विशेष अधिकार व संधी होती आणि कनिष्ठ जातींना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला होता. ही विषमता नष्ट करण्यासाठी शाहूमहाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी एक आदेश संमत करून शासकीय सेवेत ब्राह्मणेतरांना ५०% जागा राखीव ठेवल्या. जेव्हा जागा रिक्त होत तेव्हा त्यावर सुशिक्षित ब्राह्मणेतराची नेमणूक केली जाई. आपल्या राज्यात त्यांनी नागरी आणि लष्करी सेवेत अस्पृश्यांना सुद्धा नेमले.

v) सत्यशोधक समाज आणि आर्य समाज यांची स्थापना: महात्मा जोतिबा फुलेंच्या मृत्यूनंतर थंडावलेल्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे [illegible]. १९११ मध्ये कोल्हापूरात पुनरुज्जीवन करून तिचे नेतृत्त्व केले. मराठा नेत्यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यास त्यांनी प्रोत्साहन, वित्तसहाय्य व नैतिक पाठबळ पुरवले. १९१३ मध्ये त्यांनी कोल्हापूरात सत्यशोधक विद्यालय स्थापन करून त्यामध्ये एका न धनगराच्या सुशिक्षित मुलास शिक्षक म्हणून नेमले. त्यामुळे ते म. फुलेंचे खरेखुरे वारसदार ठरले.

शाहूमहाराज हे आर्य समाजाच्या कार्यानेही प्रभावित झाले होते. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात आर्य समाजाची स्थापना १९१८ मध्ये केली व राजाराम महाविद्यालय, ट्रेनिंग कॉलेज यासारख्या शिक्षण संस्थांची जबाबदारी आर्य समाजावर सोपवली. शाहूमहाराजांच्या मदतीने आर्यसमाजाने विविध सामाजिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यास मोठे योगदान दिले.

137

vi) लोकशाहीचे पुरस्कर्ते : शाहूमहाराजांनी वर्गविहीन व समतावादी समाजावर विश्वास होता. ते लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. १९१९ मध्ये त्यांनी कोल्हापूर नगरपालिकेचे प्रशासन हे निवडून आलेल्या प्रतिनिधींकडे सोपवले त्यामध्ये मागासवर्गातील काही उमेदवारही निवडून आलेले होते. कुलकर्णी वतने नष्ट केल्यानंतर त्यांनी ग्रामपंचायती स्थापन केल्या. मोफत व सक्ती च्या शिक्षणाने कनिष्ठ जातींना जातिव्यवस्थेने निर्माण केलेल्या समस्यां वर मात करण्यास समर्थ बनवले असा महाराजांचा दृढ विश्वास होता.

vii) शेती विकासास प्रोत्साहन : शेतकऱ्यांच्या जीवनमानाच्या स्तर उंचवण्यासाठी व शेती विकासासाठी शाहूमहाराजांनी भोगावती नदीवर राधानगरी नावाचे धरण बांधले. त्यावेळी कुशल कामगार व तज्ज्ञ अभियंते उपलब्ध नसतानाही त्यांनी हे धरण बांधले. त्यांनी शेतीच्या क्षेत्रात काही नवीन प्रयोगही केले. नवीन कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांत लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी १९१२ मध्ये किंग एडवर्ड कृषी संस्था स्थापन केली. लोकांमध्ये शेतीविषयीची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक खेड्यांत कृषीविषयक यात्रा व प्रदर्शने आयोजित केली.

viii) विविध कलांना आश्रय दिला : राजर्षी शाहू महाराजांना विविध कलांचे छंद होते. शिकार, मल्लविद्या, संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला इ. कलांना त्यांनी आश्रय दिला. ते स्वत: कुस्ती खेळत, प्राण्यांशी झुंज देत असत. पैलवानांना खुराक देत. गावोगावी तालमी, आखाडे बांधण्यात त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांनी अनेक नामवंत पैलवान तयार केले. विविध कलांचे पुनरुज्जीवन केले. त्यांनी पत्रकार, लेखक, कवी, शाहीर, जलसा कार आदींना आश्रय दिला. आपल्या २२ वर्षांच्या कारकिर्दीत कोल्हापूर शहराला त्यांनी कलापूर बनवले. त्यांच्यामुळे कोल्हापूर हे मल्लविद्येचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. १८९४ ते १९२२ ही त्यांची २८ वर्षांची कारकिर्द कोल्हापूर संस्थानाला नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला कलाटणी देणारी ठरली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

ix) वेठबिगारी बंद :- महाराजांनी वेठबिगारी, बलुतेदारी कायमची बंद केली. वेठबिगारी आणि बलुतेदारीमुळे अस्पृश्य लोकांना कमीपणा स्वीकारावा लागतो याची महाराजांना जाणीव होती. १८९४ पासूनच पिढ वेठबिगारी ची पध्दत बंद करून राजांनी अब्राह्मणांना संस्थानात नोकऱ्या देण्यास सुरुवात केली.

x) अन्य कार्ये: मोतीबाग तालमीची स्थापना. शाहुपुरी ही गुळाची बाजार पेठ स्थापन केली. कोल्हापूर संस्थानात गोवध बंदी कायदा केला. शाहू मिलची स्थापना केली. पाटील शाळांची स्थापना. बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी निपाणी येथे डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली. १९१७ च्या वटहुकुमाने संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. १९१९: स्त्रियांना क्रूरपणे वागवण्यास प्रतिबंध करणारा कायदा संमत. उद्योगांना चालना देण्यासाठी गडहिंग्लज व शिरोळ या गावातून जिनिंग फॅक्टरी सुरु केली. को-ऑपरेटिव्ह सहकारी सोसायटींची स्थापना.

आधुनिक महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उध्दारासाठी कोणतीही तडजोड न करता आयुष्याच्या अखेरपर्यंत झटणारा सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष म्हणून राजर्षी शाहू महाराजांना समाजसुधारकांमध्ये अग्रस्थान द्यावे लागते. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाची प्रतिमा साकारली गेली.

ESTD JUNE 1964 (Autonomous)

10/10

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor: [signature]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

6/11/2020

Class: B.A-II, Sem-IV  Div: ____  Roll No. 5168

Suppliment No. ____  Subject: HSRM

Test / Tutorial No. (Name): Muskan Abdulgani Mujawar.

**प्र.१ राजर्षी छ.शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचे परीक्षण करा.**

कोल्हापूर संस्थाने छत्रपती शाहूमहाराज हे एक थोर समाजसुधारक होते. महात्मा जोतिबा फुलेंच्या मृत्यूनंतर शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजास नेतृत्व व मार्गदर्शन पुरवले. त्यांचा जन्म २६ जून १८७४ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील 'कागल' या गावातील घाटगे कुटुंबात झाला. त्यांचे मूळ नाव यशवंतराव होते. सामान्य लोकांना शिक्षण व रोजगार पुरवून छत्रपती शाहूंनी त्यांच्या उन्नतीचे कार्य केले. त्यांचे सामाजिक कार्य पुढीलप्रमाणे.

**सामाजिक कार्य**

→ १) ब्राम्हणेतर चळवळ
→ २) कुलकर्णी वतनाचे उच्चाटन
→ ३) अस्पृश्यता निवारण
→ ४) कनिष्ठ जातींना आरक्षण
→ ५) सत्यशोधक समाज आणि आर्य समाज यांची स्थापना
→ ६) लोकशाहीचे पुरस्कर्ते
→ ७) शेती विकासास प्रोत्साहन
→ ८) विविध कलांना आश्रय दिला.
→ ९) वेठबिगारी बंद
→ १०) अन्य कार्ये

i) **ब्राम्हणेतर चळवळ**: ब्राम्हणांनी छत्रपती शाहूमहाराजांना वैदीक विधी पार पाडण्याचा अधिकार नाकारला. यातूनच वेदोक्त प्रकरण उद्भवले. महाराजांनी आपल्या राजवाड्यात वैदिक विधी करण्याचा आदेश १९०२ मध्ये काढला. व मंदिरामध्ये ब्राम्हणेतर पुरोहित नेमले. मराठा जातीतील युवकांना वैदिक विधी पार पाडण्याचे प्रशिक्षण देण्यासाठी महाराजांनी खास पुरोहित शाळा स्थापन केली. या

(159)

चळवळीमुळे समाज हा ब्राह्मण व ब्राह्मणेतर अशा दोन गटांत विभागला गेला. आणि ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध चळवळ सुरू केली.

ii) **कुलकर्णी वतनांचे उच्चाटन** : कुलकर्णी वतनदार हा ग्रामीण समुदायाच्या विकासाच्या मार्गातील मोठा अडथळा आहे, याची शाहूमहाराजांनी खात्री झाली. म्हणूनच त्यांनी 1918 मध्ये कुलकर्णी पदावर आनुवंशिकतेनुसार नियुक्त करण्याची पद्धत नष्ट करणारा व त्याऐवजी तलाठी पद्धती सुरू करण्याचा आदेश काढला. त्यांनी तलाठी पदावर कनिष्ठ जातीतील अनेक व्यक्ती नेमल्या.

iii) **अस्पृश्यता निवारण** : कनिष्ठ जातींना त्रासदायक ठरणारी बलुता पद्धती छत्रपती शाहूमहाराजांनी 1918 मध्ये नष्ट केली. 1919 मध्ये त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यतापालनास बंदी घातली आणि नळ, विहिरी, धर्मशाळा, दवाखाने व इतर सार्वजनिक ठिकाणेही अस्पृश्यांसाठी खुली केली. आंतरजातीय विवाहास पाठिंबा दिला आणि अशा विवाहांना वैधता मिळवून देण्यासाठी एक कायदा संमत केला. त्यांनी स्वतः अस्पृश्यांच्या हातचे पाणी स्वीकारून अस्पृश्यता न पाळण्याचा आदर्श इतरांना घालून दिला.

iv) **कनिष्ठ जातींना आरक्षण** : त्याकाळी उच्च जातींना शिक्षण घेण्याचा विशेषअधिकार व संधी होती आणि कनिष्ठ जातींना शिक्षण घेण्याचा अधिकार नाकारला होता. ही विषमता नष्ट करण्यासाठी शाहूमहाराजांनी 26 जुलै 1902 रोजी एक आदेश संमत करून शासकीय सेवेत ब्राह्मणेतरांना 50% जागा राखीव ठेवल्या. जेव्हा जागा रिक्त होत तेव्हा त्यावर सुशिक्षित ब्राह्मणेतरांची नेमणूक केली जाई. आपल्या राज्यात त्यांनी नागरी आणि लष्करी सेवेत अस्पृश्यांना सुद्धा नेमले.

v) **सत्यशोधक समाज आणि आर्य समाज यांची स्थापना** : महात्मा जोतिबा फुलेंच्या मृत्यूनंतर थंडावलेल्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीचे इ.स 1911 मध्ये कोल्हापूरात पुनरुज्जीवन करून नेतृत्व केले. मराठा, तेल्यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक समाजाच्या कार्यास त्यांनी प्रोत्साहन, वित्तसहाय्य व नैतिक पाठबळ पुरवले. 1913 मध्ये त्यांनी कोल्हापूरात सत्यशोधक विद्यालय स्थापन करून त्यामध्ये एका धनगराच्या सुशिक्षित मुलास शिक्षक म्हणून नेमले. त्यामुळे ते महात्मा फुलेंचे खरेखुरे वारसदार ठरले.

(Autonomous) JUNE 19..

शाहूमहाराज हे आर्य समाजाच्या कार्यातेही प्रभावित झाले होते. म्हणून त्यांनी आपल्या संस्थानात आर्य समाजची स्थापना 1918 मध्ये केली व राजाराम महाविद्यालय, ट्रेनिंग कॉलेज यासारख्या शिक्षण संस्थाची जबाबदारी आर्य समाजावर सोपवली. शाहूमहाराजांच्या मदतीने आर्यसमाजाने विविध सामाजिक व शैक्षणिक सुधारणा घडवून आणून मोठे योगदान दिले.

vi) **लोकशाहीचे पुरस्कर्ते** : शाहूमहाराजांनी दलित व समताकादी समाजावर विश्वास होता ते लोकशाहीचे पुरस्कर्ते होते. 1919 मध्ये त्यांनी कोल्हापूर नगरपालिकेचे प्रशासन हे निवडून आलेले प्रतिनिधीकडे सोपविले त्यामध्ये मागासवर्गातील काही उमेदवारही निवडून आलेले होते. कुलकर्णी वतने नष्ट केल्यानंतर त्यांनी ग्रामपंचायती स्थापना केल्या. मोफत व सक्तीच्या शिक्षणाने कनिष्ठ जातींना जातिव्यवस्थेने निर्माण केलेल्या समस्यांवर मत करण्यास समर्थ बनवले असा महाराजांच्या हृद विश्वास होता.

vii) **शेती विकासास प्रोत्साहन** : शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा स्तर उंचवण्यासाठी व शेती विकासासाठी शाहूमहाराजांनी भोगावती नदीवर राधानगरी नावाचे धरण बांधले त्यावेळी कुशल कामगार व तज्ञ अभियंते उपलब्ध नसतानाही त्यांनी हे धरण बांधले. त्यांनी शेतीच्या क्षेत्रात काही नवीन प्रयोगही केले. नवीन कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांत लोकप्रिय करण्यासाठी त्यांनी 1912 मध्ये किंग एडवर्ड कृषी संस्था स्थापन केली लोकांमध्ये शेतीविषयीची आवड निर्माण करण्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी खेड्यात कृषीविषयक यात्रा व प्रदर्शने आयोजित केली.

viii) **विविध कलांना आश्रय दिला** : राजर्षी शाहू महाराजांना विविध कलांचे छंद होते. शिकार, मल्लविद्या, संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला इत्यादी कलांना त्यांनी आश्रय दिला. ते स्वतः कुस्ती खेळत, प्राण्यांशी झुंज देत असत. पैलवानांना खुराक देत. गावोगावी तालमी, आखाडे बांधण्यात त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यांनी अनेक नामवंत पैलवान तयार केले. विविध कलांचे पुनरुज्जीवन केले त्यांनी पत्रकार, लेखक, कवी, शाहीर, तमाशा कार आदींना आश्रय दिला. आपल्या 22 वर्षांच्या कारकीर्दीत कोल्हापूर शहराला त्यांनी कलापूर बनवले त्यांच्यामुळे कोल्हापूर हे मल्लविद्येचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. 1894 ते 1922 ही त्यांची 28 वर्षांची कारकिर्द कोल्हापूर संस्थानाला नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राला कलाटणी

देणारी ठरली.

ix) **वेठबिगारी बंद**: महाराजांनी वेठबिगारी, कुळतेदारी कायमची बंद केली. वेठबिगारी आणि बलुतेदारीमुळे अस्पृश्य लोकांना कमीपणा स्वीकारावा लागतो हे यांनी महाराजांना जाणीव होती. 1894 पासून वेठबिगारीची पद्धत बंद करून राजांनी अब्राह्मणाती संस्थानात नोकऱ्या देण्यास सुरुवात केली.

x) **अन्य कार्य**: मोतीबाग तालमीची स्थापना. शाहुपूरी ही गुळाची बाजारपेठ स्थापना केली. पाटील शाळांची स्थापना. बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी निपाणी येथे डेक्कन रयत असोसिएशन संस्थेची स्थापना केली. कोल्हापूर संस्थानात गोवध बंदी कायदा केला शाहू मिलची स्थापना केली. 1917 च्या वटहुकमाने संस्थानात प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. 1919 स्त्रियांना क्रूरपणे वागवण्यास प्रतिबंध करणारा कायदा संमत उद्योगांना चालना देण्यासाठी गडहिंग्लज व चिरोळ या गावातून जिनिंग फॅक्टरी सुरू केली. को-ऑपरेटिव्ह सहकारी सोसायटींची स्थापना.

आधुनिक महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, व आर्थिक उद्धारासाठी कोणतीही तडजोड न करता आयुष्याच्या अखेरीपर्यंत झटणारा सर्वार्थ पूर्ण राष्ट्रपुरुष म्हणून राजर्षी शाहू महाराजांना समाजसुधारकांमध्ये अग्रस्थान द्यावे लागते. त्यांच्या कार्यामुळे महाराष्ट्राच्या पुरोगामित्वाची प्रतिमा स्वीकारली गेली

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

10/10

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor: [signature]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

4/11/2020

Class: B.A.II  Div: ____  Roll No.: 5179

Suppliment No.: Soujanya Ashok Nandagavi  Subject: H.S.R.M

Test / Tutorial No.: Home Assignment

1. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे सामाजिक कार्याचे परीक्षण करा?

→ आधुनिक काळात महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक आर्थिक शैक्षणिक कार्यद्वारे बहुजन समाजाला जागृत करून त्यांनी सर्वांगीण क्षेत्रात प्रगती घडवून आणणारे प्रजाहितदक्ष सत्ताधीश म्हणजेच राजर्षी छत्रपती शाहू महाराज होत. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता, अखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले.

सामाजिक कार्य =

1) शैक्षणिक कार्य :

छत्रपती शाहू महाराजांच्या मुक्रण कार्यात त्यांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. महात्मा फुले यांच्या प्रमाणेच सामाजिक सुधारणेच्या कार्यात त्यांनी शिक्षणाला प्रमुख स्थान दिले. शाहू महाराजांनी अधिकार ग्रहण केले केले तेव्हा बहुजन समाजात मॅट्रिक उत्तीर्ण झाले. त्याची संख्या अल्प होती. खेड्यात प्राथमिक शाळा नव्हत्या स्त्री-शिक्षण समाजात वाढले पाहिजे त्याशिवाय स्त्रियांच्या जीवनातील मागासलेपणा कमी होणार नाही याची जाणीव महाराजांना होती

2) सामाजिक सुधारणेचे कार्य -

छत्रपती शाहू महाराजांच्या अगोदर सामाजिक जीवनात जातीव्यवस्थेचे प्राबल्य होते. जातीभेदाच्या परंपरेमुळे भारतीय समाजात राजकीय किंवा सामाजिक जीवनात एकता नव्हती. जातीभेद ही आपल्या देशाच्या

ESTD 1964 (Autonomous)

उन्नतीच्या मार्गातील पोंड आहे. ती दूर करण्यासाठी महाराजांनी प्रयत्नाची परकाष्ठा केली. जातीभेद संदर्भात महाराजांनी केवळ विचारच मांडले नाहीत तर आपल्या वैयक्तिक वागण्यातून याविषयी समाजासमोर आदर्श उभा केला आवश्यक असे कायदे करून या विचाराच्या अंमलबजावणीचे कार्य केले.

४) वेदोक्त प्रकरण :-

शाहू महाराजांच्या जीवनात नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात आमूलाग्र बदल करणारे प्रकरण म्हणजे वेदोक्त प्रकरणाकडे पाहिले जाते महाराजांनी सुरूवातीपासून जातीभेदाला विरोध करून समाजाभिमुख धोरणाचा स्वीकार केला होता. सनातनी प्रवृत्तीचा स्वीकार करून समाजातील आपले स्थान टिकवण्याचा प्रयत्न करणाऱ्या ब्राह्मणांना हे मान्य नव्हते. सनातनी ब्राह्मणांनी करवीर राज्यात आपल्या अहंकारी वर्णवर्चस्वाच्या प्रवृत्तीमुळे अक्षरश: हैदोस घातला होता. जरी ब्राह्मण झाला भ्रष्ट तरी तो तिन्ही लोकी श्रेष्ठ ही त्यांची विचारास आचार धारा होती.

५) अस्पृश्योध्दार :-

अस्पृश्यता म्हणजे मानवजातीला लागलेला कलंक असून सामाजिक समतेच्या दृष्टीने तो हानिकारक आहे. जन्माधिष्ठित वर्णव्यवस्थेपासून अनेक जाती व जातीभेद निर्माण झाले समाजाचे स्वरूप विस्कळीत बनले भेदातून द्वेष निर्माण झाला व देशाची मुक्ती नष्ट झाली. जातीबंधने व दारिद्र्य यांनी गांजलेल्या समाजात महाराजांनी शिक्षणाची आवड निर्माण केली. अस्पृश्य मुलांना प्राथमिक शिक्षण मोफत मिळेल अशी व्यवस्था केली. १९०७ साली

145

कोल्हापूर येथे अस्पृश्य मुलांसाठी मिस क्लार्क वसतिगृह सुरू केली.

5) वेठबिगारी बंद :-

महाराजांनी वेठबिगारी बलुतेदारी कायद्याने बंद केली. वेठबिगारी व बलुतेदारीमुळे महाराजांना कमीपणा स्वीकारावा लागतो. लाचारीने वागावे लागते याची जाणीव महाराजांना होती.

6) स्त्रियांची स्थिती सुधारणा :-

समाजातील स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या कार्याला महाराजांनी महत्त्व दिले. स्त्री-शिक्षणाला चालना दिली. स्त्रियांच्या बाबतीत प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. स्त्रिया शिक्षित झाल्या तर कुटुंब, समाज व पर्यायाने देशाचा विकास होईल असा त्यांचा विश्वास होता. आंतरजातीय विवाह घडवून आणला.

7) ब्राम्हणेतर चळवळ :-

स्वराज्याच्या महाराजांच्या वास्तववादी रचनेमुळे त्यांनी सार्वजनिक शिक्षणप्रसार व जातीभेदाची बंधने शिथिल करण्यास निरनिराळ्या उपाययोजना केल्या. शिक्षणप्रसार करणे कायदे केले. बहुजन समाजात शिक्षणप्रसार करणे धार्मिक बंधनातून समाजाला राजकीय हक्क मिळवून देणे हे त्यांनी आपले कार्य मानले. समान संधीसाठी सामाजिक आर्थिक शैक्षणिक हक्क व बहुजन समाजाला मिळवून देणे हे ब्राम्हणेतर चळवळीचे प्रमुख सूत्र होते.

8) कला क्रीडा क्षेत्राचा विकास :-

छत्रपती शाहू महाराजांनी जुन्या राज्यात कुस्त्यासाठी आखाडा बांधून दिला. कुस्त्यासाठी [illegible] तयार केले. निरनिराळ्या पहिलवानांना बालपणासाठी [illegible]

आवश्यक ते सर्व सहकार्य केले. समाजात व्यायामाची आवड निर्माण केले.

९) मराठा समाजाचे धर्मपीठ:

शाहू महाराजांच्या शासकीय, राजकीय आणि सामाजिक सुधारणांच्या मार्गात जगत गुरु यांचा नेहमीच अडथळा व विरोध करीत होता. हा विरोध सत्ता धर्मसत्ता पाठीशी होऊन ते करीत राहिले तेव्हा महाराजांनी मराठ्यांसाठी नवे 'धर्मपीठ' उभी करून शंकराचार्यांची सार्वभौम धर्मशक्ती नष्ट करण्याचा निश्चय केला.

१०) करवीर नगरीचा विकास:

कोल्हापूर हे त्यांचे गाव आहे हे अनेक गाव 14 तळ्यांनी व्यापले आहेत तसेच अनेक कुंडे सुबक आहेत. कोल्हापुरात आरोग्य सुविधा नगरस्थानेतील सौंदर्याची वाढ व सुधारणा सार्वजनिक सुखसोई यांच्याकडे लक्ष दिले. कोल्हापूरचा सर्वांगीण विकास केला.

११) जातिभेद निर्मुलनाचा प्रयत्न:

समाजात विविध जाती, उपजाती आणि जमाती होत्या प्रत्येक जाती धर्मांचे विविध रिती रिवाज ही होते. त्यांच्यात सामाजिक ऐक्य राहणे अशक्य होते. समाजात जातिभेदाची कल्पना रूढ होती.

अशा प्रकारे शाहू महाराजांनी समाजाच्या हितासाठी कार्य केले.

... COLLEGE ... ESTD JUNE 1964 (Autonomous)

10/6

" ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार "
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Signature of Supervisor: [signature]

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's
# VIVEKANAND COLLEGE (Autonomous), KOLHAPUR

Class: B.A-II (Sem-IV) Div. 4/11/2020 Roll No. C5187

Suppliment No.: Home Assignment Subject: History of Social Reformers in Maharashtra [HSRM]

Test / Tutorial No.: Omkar Sachin Palkhande

प्रश्न-1 राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचे परिक्षण करा.

→ छत्रपती शाहू महाराजांच्या अगोदर सामाजिक जीवनात जातिव्यवस्थेचे प्राबल्य होते. जातिभेदाच्या परंपरेमुळे भारतीय समाजात राजकीय किंवा सामाजिक जीवनात एकता अस्तित्वात नव्हती. समाजाचा विकास करून सामाजिक परिवर्तन करावे ही शाहू महाराजांची तळमळ होती. त्यामुळे त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग समाज सुधारण्यासाठीच मोठ्या प्रमाणात केला.

जातीयता अर्थात जातिभेद नष्ट करण्यासाठी त्यांनी विविध मार्गाचा अवलंब केला. जातीयतेची कृत्रिम बंधने मोडून टाकण्यासाठी विविध व्याख्याने दिली. तसेच ठिकठिकाणी सामाजिक विषमते विरुद्ध परिषदा घेतल्या. महार, मांग व चांभार या अस्पृश्यांचे जीवन वाईट होते. त्यांना सार्वजनिक पाणवठे व मंदिरे खुली नव्हती. शाहू महाराजांनी राज्यातील सार्वजनिक पाणवठे व मंदिरे खुली केली. शाहू महाराज हे बोलके नव्हते तर ते कृतीशील समाज सुधारक होते.

Vivekanand College ESTD JUNE 1964 (Autonomous)

[B] राजर्षी शाहू महाराजांनी केलेले सामाजिक कार्य पुढील प्रमाणे

I अस्पृश्योध्दार -

शाहू महाराज सत्तेवर आल्यावर कोल्हापूर संस्थानात दलितांची संख्या समाजात मोठ्या प्रमाणात होती, त्यांना शिक्षणाची गरज होती. दलित समाजाचे वसतिस्थान गावाच्या बाहेर होते. समाजात त्यांना अत्यंत अपमानास्पद वागणूक दिली जात असे. संस्थानात अस्पृश्य समाजाची संख्या जवळपास लाखाच्या आसपास होती.

समाजात त्यांना खालच्या दर्जा देण्यात आल्यामुळे महाराजांनी व अस्पृश्योध्दाराचे कार्य हाती ~~आल्यामुळे महाराजांनी~~ व घेतले. यासाठी महाराजांनी कायदेशीर निर्णय घेतले त्यांनी अस्पृश्योध्दारासाठी पुढील पावले उचली.

I) अस्पृश्य व्यक्तीसाठी असलेल्या शाळेच्या संख्येत त्यांनी वाढ केली.

II) शाळेच्या संस्थेवरून [illegible] मध्ये त्यांची संख्या श झाली.

III) खासगी खर्चातून ७ व दरबारी सरकारी खर्चातुन ५ अशी एकुण १ वसतीगृहे त्यांनी चालविले.

IV) अस्पृश्य विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत त्यांनी दिली. अस्पृश्य व्यक्तिला शासकीय कार्यालयात भरती दिली.

V) शिक्षण, आरोग्य व इतर कोणत्याही सरकारी खात्यात अस्पृश्यता पाळू नये असा नियम त्यांनी केला.

(149)

II अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह

I) राजर्षी शाहू महाराजांनी १५ एप्रील

१९०८ मध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु केली. अस्पृश्य वर्गासाठी अस्पृश्यमुख्य सुशिक्षित आणि सुधारणावादी पुढारी निर्माण व्हावेत.

